श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# Nit Document

## परिशिष्ठ क्र.१

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,मुंबई

मंदिरात पूजेसाठी लागणारी फळे व केळी खरेदी करण्यासाठी ई – निविदा मागविण्याबाबत.

फोन नंबर – ०२२ – २४२२४४३८ , २४२२२१५८

ई – निविदा सूचना :

पूजेसाठी फळे व केळी पुरवठा कालावधी
दि. १ ऑक्टोबर २०२४ ते ३१ मार्च २०२६

मंदिरात पूजेसाठी लागणारा ५ फळांचा संच, साधी केळी ववेलची केळी खरेदी करण्यासाठी ई – निविदा मागविण्यात येत आहेत. ई- निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या वेबसाईटला भेट द्यावी.

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिध्दिचा वार व दिनांक | :– गुरूवार दि. २९ ऑगस्ट २०२४. |
| निविदापुर्व बैठक दिनांक | :– मंगळवार दि. ०३ सप्टेंबर २०२४ दु. ३.०० वा. |
| ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | :– शनिवार दि. ०७ सप्टेंबर२०२४ सायं. ५.४५ वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– मंगळवार दि. १० सप्टेंबर २०२४ दु. २.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– मंगळवार दि. १० सप्टेंबर २०२४ दु. ३.०० वा. |
| स्थळ | :– श्रीसिध्दिविनायक मंदिर न्यास, तिसरा मजला, समिती कक्ष न्यास कार्यालय. प्रभादेवी, मुंबई |

Vpatil
( वीणा पाटील )
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

मंदिरात पूजेसाठी लागणारा ५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी खरेदी करण्यासाठी ई – निविदा मागविण्याबाबत.



| अ.क्र | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | ई निविदा मागविण्याबाबतची माहिती. | १ |
| २ | ई निविदेच्या अटी व शर्ती. | ३ ते ७ |
| ३ | ई निविदेची किंमत /शुल्क, बयाणा रक्कम व पतदारी दाखला व आर्थिक उलाढालीची माहिती. | ८ |
| ४ | निविदाधारकाने (**Technical Bid**) करीता ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे. | ९ |
| ५ | हमीपत्र (नमुना) | ११ |
| ७ | निविदाधारकाबाबतची माहिती (नमुना) | १२ |
| ८ | मागील ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असणारे सी.ए यांचे प्रमाणपत्र. | |
| ९ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशन (**BOQ**) तपशील. | |

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

| अ.क्र | ई – निविदा मागविण्याबाबतची माहिती |
|---|---|
| १ | मंदिरात पूजेसाठी लागणारी फळे व केळी खरेदी करण्याकरिता ई – निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. |
| २ | ऑनलाईन इंटरनेट बँकींगकरीता एस.बी.आय बँक किंवा इतर इंटरनेट बँकींगकरीता एस.बी.आय **MOPS** ( **Multiple Option Payment System** ) चा वापर करावा. |
| ३ | ई – निविदा अपलोड करतेवेळी निविदा प्रपत्राची रक्कम (**Tender Fee**) रु २,५०० / - व बयाणा रक्कम (**Emd**) रु २५,००० / - इतकी ऑनलाईन इंटरनेट बँकींगमार्फतच जमा करावी लागेल. पान क्र. ८ वरील जोडपत्र “अ” मधीत रकाना – १ नुसार. |
| ४ | ई – निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बँकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदा प्रपत्राची रक्कम (**Tender Fee**) व बयाणा रक्कम (**Emd**) पावती प्रत स्कॅन करून अपलोड करावयाची आहे. बयाणा (**Emd**) रक्कमेवर कोणतेही व्याज अनुज्ञय राहणार नाही. |
| ५ | ई – निविदेसोबत राष्ट्रीय किंवा अनुसूचित बँकेचा पतदारी दाखला (**Solvency Certificate**) अपलोड करणे आवश्यक आहे. पतदारी दाखला न्यासास पुरवठा करावयाच्या एकूण मालाच्या मूल्याच्या अंदाजे ३०% रक्कमे इतका असावा. (१ ऑक्टोबर २०२४ ते दि. ३१ मार्च २०२६ याकालावधीत पुरवठा करावयाच्या एकूण मालाच्या किंमतीच्या ३०% प्रमाणे). पुरवठा करावयाच्या मालाचे अंदाजित प्रमाण पान क्र. ८ वर नमूद केले आहे. |
| ६ | अपलोड करावयाच्या तांत्रिक निविदेच्या (Technical) कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा. |
| ७ | ई – निविदेसोबत पान क्र ९ वर नमूद केलेली कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. त्यानंतर मूळ निविदा (**Commercial**) उघडण्यात येईल. |
| ८ | ई – निविदाधारकाने तांत्रिक निविदा व बीड ऑफ कोटेशन (**BOQ**) भरतांना माहिती अपूर्ण ठेवल्यास / राहिल्यास त्या ई – निविदा कोणतेही कारणे न देता रद्द समजण्यात येतील. त्याबद्दलचा अंतिम निर्णय हा श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास समितीने राखून ठेवला आहे. |

| अ.क्र | अटी व शर्ती |
|---|---|
| १ | कमी जास्त दराची कोणतीही ई – निविदा स्विकारण्याचा / नाकारण्याचा अथवा सर्व ई – निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार न्यासाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे / स्पष्टीकरणे देणे श्रीसिद्धिविनायक न्यासास बंधनकारक राहणार नाही. |
| २ | ज्याची निविदा मान्य होईल त्या निविदाधारकाने कार्यादेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत निविदा रक्कमेच्या ५ % बयाणा (Emd)रक्कमेची बँक गॅरंटी न्यासाकडे जमा करावी, बयाणा रक्कम वगळून उर्वरित रक्कमेची बँक गॅरंटी स्विकारली जाईल. म्हणून १ वर्षासाठी न्यासाकडे जमा केली पाहिजे. निविदेत नमूद केलेल्या कामाबद्दल कोणतेही तक्रार नसेल तर कामाचा कालावधी संपल्यानंतर ९० दिवसांनी बयाणा रक्कम परत केली जाईल. बयाणा (Emd) रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही. |
| ३ | दैनंदिन अथवा कमी जास्त मुदतीत पूजेसाठी लागणारा ५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी मागणी केली जाईल. मागणीनुसार पूजेसाठी लागणारी फळे स्वीकारली जातील तसेच मागणीपेक्षा जास्त लागणारी फळे स्विकारली जाणार नाहीत. त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही. |
| ४ | निविदाधारकाने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यास पूजेसाठी लागणारी फळे (५फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) पुरवठा करणे आवश्यक असेल. विहित मुदतीत पूजेसाठी लागणारी सदर फळे पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण / नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजारभावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाची पूजेसाठी लागणारी फळे (५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) खरेदी करण्याचे अधिकार / मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रक्कमेची भरपाई निविदाधारकास करावी लागेल. सदर भरपाई देयकाच्या रक्कमेतून वा बयाणा रक्कमेतून करण्यात येईल. |
| ५ | निविदाकाराने पूजेसाठी लागणारी फळे (५फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) पोहोच स्वखर्चाने श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी दादर, मुंबई येथे न्यासाचे खरेदी विभागात दिली पाहिजे. न्यासाकडून मालाच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. खरेदी विभागात पूजेसाठी लागणारी फळे (५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) उतरविण्याची वाराई आपणास द्यावी लागेल. |

| अ.क्र | अटी व शर्ती |
|---|---|
| ६ | दुय्यम वा कमी दर्जाची फळे ( ५फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी ) स्विकारली जाणार नाहीत. अशी फळे ( ५फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी ) पुरवठा केल्यास ती स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे आपणावर बंधनकारक राहील. अन्यथा पूजेसाठी लागणारी फळे ( ५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी ) नासधूस झाल्यास त्याकरिता न्यास जबाबदार राहणार नाही. खराब फळांची अदायगी केली जाणार नाही. |
| ७ | निविदा प्रक्रियेत स्विकृत झालेले दर निविदा कालावधीसाठी कायम राहतील. मान्य दरामध्ये सदर कालावधीत कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही. आपण पूजेसाठी लागणारी फळे ( ५फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी ) पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास आपली पूर्णतः अथवा अंशत: बयाणा रक्कम न्यासाकडे जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील. |
| ८ | बिल सादर करतांना बिलात खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच पूजेसाठी लागणारी फळे ( ५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी ) नावाचा तपशील असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये अन्यथा देयक अदा केले जाणार नाही. |
| ९ | पुरवठा करण्यात आलेल्या पूजेसाठी लागणाऱ्या फळांची तपासणी करून त्यांचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा केले जाईल. पुरवठ्याबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. |
| १० | देयकामध्ये कर वगळून सर्व खर्चासहीत दराचा उल्लेख करावा . प्रचलित नियमानुसार आयकर कपात केली जाईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. |
| ११ | निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसात समक्ष येऊन रु १०० / -चा गैरन्यायिक STAMP पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील. परंतु अशा प्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा निविदाकाराने करारनामा करण्यास टाळाटाळ केल्यास सदर निविदेत नमूद अटी व शर्ती या करारनाम्याचा भाग समजण्यात येतील व सदरील अटी व शर्ती निविदाकारावर बंधनकारक असतील. त्याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील. |

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

| अ.क्र | अटी व शर्ती |
|---|---|
| १२ | पुरवठा आदेश व बिलाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील. |
| १३ | श्रीसिद्धीविनायक गणपती मंदिर न्यास, आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त कंत्राटदाराला कार्यादेश देऊ शकतो. |
| १४ | ई – निविदा भरतांना कर वगळून मूळ किंमत भरावी. कर अतिरिक्त राहील. |
| १५ | ई – निविदापूर्व बैठकीच्या वेळी न्यासातर्फे दाखवण्यात येणारी पूजेसाठी लागणारी फळे (५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) उपलब्ध करून देणे निविदाकारास आवश्यक राहील. |
| १६ | ई – निविदेत नमूद पुरवठा करण्याच्या पूजेसाठी लागणारी फळे (५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) पुरवठ्यामध्ये कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील. |
| १७ | ई – निविदेत नमूद केलेली फळे (५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) निविदाधारक यांनी दुसऱ्या उप निविदाधारकाला सदरील काम दिल्याचे आढळल्यास निविदाधारकाची निविदा रद्द करण्यात येईल. |
| १८ | **NIT DOCUMENT** मध्ये नमूद केलेले Specitication नुसार निविदाप्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाकारांनी त्यांच्या कडील अशा स्वरूपाच्या फळांचे ( ५फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी ) नमुने तांत्रिक निविदा उघडतांना न्यासास सादर करावे. तसेच ई – निविदाधारकांनी पान क्र. ९ मध्ये दर्शवलेली कागदपत्रे साक्षांकित करून त्याचा संच न्यासास सादर करणे आवश्यक आहे. |
| १९ | सदरची ई- निविदा कार्यदेश नसून फक्त बीड ऑफ कोटेशन (BOQ) मागविण्यासाठी आहे. |
| २० | ई – निविदेमधील अटी व शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई – निविदा सादर करावी. |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

| | |
|---|---|
| २१ | ई – निविदाधारकाराची मागील तीन वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल रु.४० लक्षापेक्षा जास्त असावी. याकरिता वर्ष २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२३, २०२३-२४ या चार वर्षापैकी कमाल सरासरी आर्थिक उलाढालीची तीन वर्षे विचारात घेण्यात येतील. |
| २२ | ई - निविदेसंदर्भात काही शंका असेल तर त्यांनी श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास,प्रभादेवी, मुंबई येथे खालील नमूद क्रमांकावर संपर्क करावा. |
| २३ | ज्या दिवशी ई – निविदा उघडण्यात येणार आहे त्या दिवशी ई – निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सांक्षांकित प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल. |
| २४ | कोणतेही कारण न देता ई – निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल. |
| २५ | उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्थी विहित करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाही. |
| २६ | अनावधानाने एखादे कागदपत्र अपलोड करावयाचे राहिल्यास तांत्रिकनिविदा उघडते वेळी ते सादर करता येईल. मात्र सदर कागदपत्र निविदेच्या अंतिम दिनांकापूर्वीचे असावे. |
| २७ | संकेतस्थळाच्या माहितीकरीता टोल फ्री क्रमांक १८०० – ३०७० – २२३२,<br>श्रीमती वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी, मो. क्र. ९९३०९४२४२८<br>श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी, मो. क्र. ९३२४९९९०९४<br>श्रीमती उज्वला राणे, वित्त वलेखा अधिकारी, मो. क्र. ९८२१६००९४१<br>श्रीमती वंदना राऊत, लिपिक, मो. क्र. ९५९४२४९७४५ |

Vpatil

( वीणा पाटील )
कार्यकारी अधिकारी

**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८**

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## निविदा शुल्क व बयाणा रक्कमेबाबतचे जोडपत्र "अ"

### रकाना – १

| अ. क्र. | फळांचे तपशिल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजित माल | निविदेची किंमत/शुल्क (रू.) | बयाणा रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | अ) फळांचा संच | १३,५०० संच | २,५००/– | २५,०००/– |
| | ब) साधी केळी | २,८०० डझन | | |
| | क) वेलची केळी | १,३५० डझन | | |

### पतदारी दाखला (Solvency Certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती.

### रकाना – २

| अ.क्र. | फळांचे तपशिल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजित माल | पतदारी दाखला (Solvency Certificate) |
|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (इ) |
| १ | अ) फळांचा संच | १३,५०० संच | दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत पुरवठा करावयाच्या मालाच्या एकुण किंमतीच्या ३०% |
| | ब) साधी केळी | २,८०० डझन | |
| | क) वेलची केळी | १,३५० डझन | |

**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८**
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदासाठी ( **Technical Bid** ) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत.

| अ.क्र | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई – निविदेसोबत निविदेची किंमत / शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बँकेकडील पावती पत्र. |
| २ | बयाणा रक्कम ( **EMD** ) केल्याबाबतची इंटरनेट बँकेकडील पावतीची प्रत. |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला ( **shop act license** ) ट्रेडिंग लायसन्स/ गुमास्ता लायसन्स/उद्यम प्रमाणपत्र यापैकी एक |
| ४ | आयकर नोंदणी पॅनकार्ड. |
| ५ | जी एस टी नोंदणी दाखला |
| ६ | पतदारी दाखला ( Solvency Certificate ) |
| ७ | आर्थिक वर्ष ( २०२०-२०२१,२०२१-२०२२,२०२२-२३,२०२३-२४ ) यापैकी तीन वर्षाचे आय.टी.आर रिटर्न्स. |
| ८ | आर्थिक वर्ष ( २०२०-२०२१,२०२१-२०२२,२०२२-२३,२०२३-२४ ) यापैकी तीन वर्षाचे जी.एस.टी रिटर्न्स. |
| ९ | सन ( २०२०-२०२१,२०२१-२०२२,२०२२-२३,२०२३-२४ ) या ४ वर्षापैकी कमाल आर्थिक उलाढाल असलेल्या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असलेली सी.ए यांचे प्रमाणपत्र.<br>टीप :- ३ वर्षाची आर्थिक उलाढाल सरासरी रु.४० लक्षापेक्षा जास्त असावी |
| १० | हमी पत्र |
| ११ | निविदा उघडण्याच्या वेळी कंपनी / संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्यांचे नावाचे प्राधिकर पत्राची प्रत. |
| १२ | मूल्य निविदा ( वाणिज्य **Commercial** ) **BOQ** |
| १३ | टीप- अपलोड केलेल्या कागदपत्रांचा एक संच न्यासास सादर करावा. |

( फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर )

# हमी पत्र

दिनांक -      /      /२०२४

प्रति,

कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास,

प्रभादेवी , मुंबई – २८

महोदया,

मी / आम्ही ........................................................................................... खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी / आम्ही कागदपत्रे , अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही

२. मी / आम्ही नमूद केलेला दर हा मूळ दर ( सर्वखर्चासह ) व अधिक कर ( जी.एस.टी ) असा आहे.

३. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहित केल्यानुसार रक्कम देण्यास बांधील आहोत.

४. ई – निविदेत नमूद केलेले पूजेसाठी लागणारी फळे ( ५ फळांचा संच, साधी केळी व वेलची केळी) करणे बंधनकारक राहील.

५. आम्हास माहित आहे कि , निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

६. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती तसेच अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या आम्हास बंधनकारक आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

( फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर )

## निविदाधारकाची माहिती

| | | |
|---|---|---|
| १) | कंपनीचे नाव | : ........................................................................ |
| २) | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | : ........................................................................ |
| | | ........................................................................ |
| ३) | दूरध्वनी क्रमांक | : ........................................................................ |
| | मोबाईल क्रमांक | : ........................................................................ |
| | ई – मेल | : ........................................................................ |
| ४) | संपर्कासाठी व्यक्तीचे नाव | : ........................................................................ |
| ५) | मोबाईल क्रमांक | : ........................................................................ |
| ६) | जी.एस.टी क्रमांक | : ........................................................................ |
| ७) | आयकर नोंदणी पॅन क्रमांक | : ................................................................ |

निविदाधारकाची सही व शिक्का

( सी.ए यांच्या लेटरहेडवर )

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे ..........................................................................................

यांच्या व्यवसायाची वर्ष (२०२०-२०२१,२०२१–२०२२,२०२२-२३,२०२३-२४) या चार वर्षापैकी कोणत्याही कमाल (जास्त उत्पन्न) तीन वर्षाची उलाढाल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२० – २०२१ | |
| २ | वर्ष २०२१ – २०२२ | |
| ३ | वर्ष २०२२ – २०२३ | |
| ४ | वर्ष २०२३ – २०२४ | |
| | एकूण उलाढाल | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / / २०२४

लेखापरीक्षकाची सही / चार्टड अकाऊंट
( नाव / सही शिक्का )

नोंदणी क्रमांक :-

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# मुळ निविदा ( BOQ )

## निविदेमध्ये खालील बाबी अंतर्भूत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव : ...........................................................................

निविदाधारकाचा पत्ता : ...........................................................................
...........................................................................

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी दाखला : ...........................................................................

जी.एस.टी क्रमांक : ...........................................................................

| अ.क्र | फळांचेवर्णन | दर रुपये (कर वगळून) |
|---|---|---|
| १ | ५ फळांचा १ संच<br>(मोसंबी, पेर, सफरचंद, माल्टा, डाळिंब,किवा चिकू) | |
| २ | साधी केळी १ डझन<br>(हिरव्या सालीची) | |
| ३ | वेलची केळी १ डझन | |